MHAM180017262021

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्राप्त दिनांक | : | २८/०६/२०२१ | | |
| नोंदणी दिनांक | : | २८/०६/२०२१ | | |
| निकाल दिनांक | : | २१/०५/२०२६ | | |
| कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | ०४ | १० | २३ |

## सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वरुड, ता.– वरुड, जि.– अमरावती यांच्या न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी व्ही.व्ही. राजुरकर)

**नि. दिवाणी दावा क्र. ४४/२०२१** **निशाणी क्र. ३९**

**दत्तात्रय संस्थान (मंदीर),**
शनिवार पेठ, वरूड,
ता. वरूड जि. अमरावती.
द्वारा :– **अरुण गुलाबराव पोहणे,**
वय :– ३८ वर्ष, धंदा :– शेती,
रा. :– वरूड,
ता. :– वरूड, जि. :– अमरावती. . . . **वादी**

– **विरुध्द** –

०१. **श्रीमती चंद्रकला ज्ञानेश्वर सोळंकी**,
वय :– ६० वर्ष, धंदा– घरकाम,

०२. **श्री. अरुण ज्ञानेश्वर सोळंकी**,
वय :– ३७ वर्ष, धंदा :– मजुरी,

०३. **सौ. उमा अरुण सोळंकी**,
वय :– ३२ वर्ष, धंदा– घरकाम,
सर्व रा. :– शनिवार पेठ, वरूड,
ता. :– वरुड, जि. :– अमरावती. . . . **प्रतिवादी**

## कायम मनाई हुकूम व मँडेटरी हुकूम मिळणेबाबत.

| | |
|---|---|
| वादी तर्फे विधीज्ञ | : श्री. ए. आर. घाटोळे. |
| प्रतिवादी तर्फे विधीज्ञ | : श्री. निखिल बावने. |

**वादीचे थोडक्यात वाद कथन खालील प्रमाणे –**

वादी दत्तात्रय संस्थान मंदिर, शनिवार पेठ वरूड यांचे मालकीची नगर परिषद वरूड हद्दीमधील नझुल शिट क्र.२३ सी.स.नं. ३२९०, क्षेत्रफळ १४७ चौ.मी. ही वादीचे मालकीचे असून ती दावा नकाशामध्ये अ–ब–क–ख या अक्षराने दर्शविली आहे व तिला यापुढे वाद मिळकत असे संबोधण्यात येते. वादी संस्थेतर्फे सदर प्रकरण दाखल करण्याचे अधिकार अरुण गुलाबराव पोहणे यांना देण्यात आले आहे. दावा नकाशामधील नविन बांधकाम म्हणून दर्शविलेल्या ठिकाणी पूर्वी साखरे महाराज यांची खोपडी होती. सदर ठिकाणी प्रतिवादींनी नविन विटा व सिमेंटचे बांधकामास दि.०५/०४/२०२१ रोजी सुरुवात केली. तसेच त्यापूर्वी दि.०१/०४/२०२१ रोजी प्रतिवादींनी सदर मंदिराच्या उत्तर दिशेला कच्चे तुऱ्हाटयाचे कुंपन घालून त्यावर टिन टाकून खोपडी तयार केली. तसेच वाद मिळकतीच्या पश्चिमेकडे देखील तुऱ्हाटयाचे कुंपन त्याचदिवशी प्रतिवादींनी तयार केले. तसेच प्रतिवादींनी वाद मिळकतच्या पश्चिम–उत्तर वरील कोपऱ्यावर संडास बांधला. सदर वाद मिळकतीवर पुरातन काळापासून मंदिर असून सदर जागा ही श्री. एम.जी. कल्याण भाटीया यांनी दि.०३/०९/१९५५ रोजी बक्षिसपत्राद्वारे वादी संस्थानला दिली. त्यावेळी सदर संस्थानवर सखाराम महाराज हे पुजारी म्हणून काम करत होते व ते वाद मिळकतीवरील एका खोपडीमध्ये राहत होते. साखरे महाराज हे मयत झाल्यानंतर त्यांचे नातेवाईक असलेले प्रतिवादी हे सदर खोपडीमध्ये राहून सदर मंदिराची साफसफाई व पुजा करत होते व त्यामुळे प्रतिवादींना वादीतर्फे सदर खोपडीमध्ये राहू देण्यात आले.

०२) प्रतिवादींनी सदर खोपडीमध्ये राहत असल्याचा गैरफायदा घेऊन सदर वाद मिळकत स्वत:ची असल्याचे दाखविणे सुरू केले व त्यावरून त्यांनी सदर मंदिरास लागून कच्ची खोपडी उभारली व त्यास लागून तुऱ्हाटयाचे कुंपन टाकले व संडासचे बांधकाम केले. त्यामुळे मंदिरामध्ये येणाऱ्या भक्तांना जाण्या येण्यासाठी नेहमी अडथळा निर्माण होत आहे. सबब वादी संस्थानच्या वतीने प्रतिवादींना सदर अडथळा निर्माण करण्यास मनाई केली असता प्रतिवादी क्र.०३ हिने संस्थानच्या सभासदांना व भक्तांना धमक्या दिल्या की, जर या कुंपन आणि दरवाज्याच्या आत कोणी आले तर तिची शारीरिक छेडखानी केल्याबाबत ती पोलीस स्टेशनला तक्रार करेल. प्रतिवादींनी बेकायदेशीररीत्या वाद मिळकतीमध्ये नविन बांधकाम सुरू केल्यामुळे सदर वादी संस्थेचे अध्यक्ष आणि सचिव यांनी दि.०५/०४/२०२१ पोलीस स्टेशन वरूड व नगर परिषद वरूड यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या. सदर तक्रारीवरून नगर परिषद वरूड यांनी दि.०९/०४/२०२१ रोजी प्रतिवादींना नोटीस देऊन वाद मिळकतीवरील बांधकाम थांबविण्यासंदर्भात कळविले परंतु सदर बांधकाम प्रतिवादींनी थांबविले नाही. तसेच सदर खोपडीची जागा प्रतिवादी क्र.०१ ने मालमत्ता कर भरण्याच्या अनुषंगाने नगर परिषद वरूड येथे स्वत:च्या नावे लावून घेतली. प्रतिवादींनी नगर परिषद वरूड यांची कोणतीही बांधकाम परवानगी न घेता वाद मिळकतीवर अवैध बांधकाम सुरू केले आहे. सदर बांधकाम करण्यास त्यांना परवानगी दिली तर वादी वाद मिळकतीवरील मालकी हक्क व ताब्यापासून वंचित होऊन त्याचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल. सदर बांधकामामुळे मंदिरामध्ये येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे प्रतिवादींना त्यांनी वाद मिळकतीवर केलेले बांधकाम काढून टाकण्यासंदर्भात तसेच यापुढे त्यांनी वाद मिळकतीवर बांधकाम करू नये व त्यावर मालकी हक्क व अधिकार दाखवू नये यासंदर्भात मनाई हुकूम आदेश वादीतर्फे देण्यात यावा. करिता सदर दावा.

०३) दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर सर्व प्रतिवादी दि.०५/०७/२०२१ रोजी त्यांच्या वकिलामार्फत हजर झाले. परंतु त्यांनी त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे दि.२४/०८/२०२१ रोजी **नि.क्र.०१** खाली आदेश पारित करून सदर प्रकरण प्रतिवादींचे लेखी जबाबाशिवाय पुढे चालविण्यात आले.

०४) वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.आर. घाटोळे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रतिवादीतर्फे त्यांचे विधीज्ञ युक्तिवादाकरिता हजर राहिले नाहीत.

०५) वादीचे युक्तिवादावरून तसेच दाव्यातील नमूद कथनावरून पुढील मुद्दे निश्चित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष हे त्याखाली नमूद केलेल्या कारणमीमांसेवरून नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वाद–मिळकतीचा वादी मालकी हक्काने ताबेदार असल्याबाबत वादी सिद्ध करतो काय ? | **होय.** |
| २) | वाद मिळकतीवर प्रतिवादींनी गैरकायदेशीर हक्क दाखवून त्यावर बांधकाम केले असे वादीने सिद्ध केले आहे काय ? | **होय.** |
| ३) | प्रतिवादींनी वाद–मालमत्तेवर केलेल्या गैरकायदेशीर बांधकामामुळे वादीला तसेच वाद–मालमत्तेमध्ये येणाऱ्या–जाणाऱ्या लोकांना अडथळा निर्माण होत आहे असे वादीने सिद्ध केले आहे काय ? | **होय.** |
| ४) | वादी कायम मनाई हुकूम तसेच मँडेटरी हुकूम मिळण्यास पात्र आहे काय ? | **होय.** |
| ५) | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | **दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**युक्तिवाद :–**

०६) वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.आर. घाटोळे यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद **नि.क्र.३७** प्रमाणे दाखल केला. वादीतर्फे युक्तिवाद करण्यात आला की, दावा मिळकत ही एम.जी. कल्याण भाटीया यांनी दि.०३/०९/१९५५ रोजी बक्षिसपत्राद्वारे वादी संस्थेला दिली होती. तेव्हापासून तिथे दत्तात्रय मंदिर आहे व वादी संस्था त्याचे काम पाहतात. सदर मंदिरावर सखाराम महाराज हे पुजारी होते व ते वाद मालमत्तेवरील एका खोपडीमध्ये राहत होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नातेवाईक प्रतिवादी हे सदर खोपडीमध्ये राहून मंदिराची साफसफाई व पुजा करत होते. काही वेळानंतर प्रतिवादींनी सदर खोपडीमध्ये राहत असल्याचा गैरफायदा घेऊन त्यावर स्वत:चा मालकीहक्क दाखविणे सुरू केले व त्याद्वारे त्यांनी मंदिराला लागून एक कच्ची खोपडी, तुऱ्हाटयाचे कुंपन, एक संडास व दरवाजा उभा केला. त्यामुळे वादींना तसेच इतर लोकांना मंदिरामध्ये येण्या जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. वादीने प्रतिवादींना सदर अडथळा दुर करण्याबाबत सांगितले असता प्रतिवादींनी वादी संस्थेतील सभासदांना धमकाविले. त्यामुळे वादीने दि.०५/०४/२०२१ रोजी पोलीस स्टेशन वरूड येथे तसेच नगर परिषद वरूड येथे तक्रारी देखील केल्या. सदर तक्रारीवरून प्रतिवादींना नोटीस पाठविण्यात आली व बांधकाम थांबविण्या संदर्भात कळविण्यात आले. परंतु तरीही प्रतिवादींनी सदर बांधकाम बंद केले नाही. त्यामुळे प्रतिवादींविरोधात मनाई हुकूम आदेश पारित करावा अशी विनंती वादी तर्फे करण्यात आली.

०७) प्रतिवादीतर्फे न्यायालयासमक्ष कोणीही हजर राहिले नाही. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादाविना सदर प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**पुरावा :–**

**०८)** वादीतर्फे सदर प्रकरण सिद्ध करण्याकरिता एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी वादी अरुण गुलाबराव पोहणे (सा.क्र.०१) याने त्याचा पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र.१८** वर दाखल केला आहे. त्यानंतर वादीतर्फे सुरज मधुकरराव देशमुख (सा.क्र.०२) व घनश्याम गणेशराव अस्वलकर (सा.क्र.०३) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर **नि.क्र.३४** प्रमाणे पुरशिस दाखल करून वादीने त्यांचा पुरावा बंद केला.

**०९)** त्याचप्रमाणे वादीने त्यांच्यातर्फे काही कागदोपत्री पुरावा दाखल केला तो पुढीलप्रमाणे :–

१) मालकी हक्क दाखला (**नि.क्र.२१**),

२) कर आकारणी सूची (**नि.क्र.२२**),

३) ७/१२ उतारा (**नि.क्र.२३**),

४) नगर परिषदर वरूड यांनी प्रतिवादींना दिलेल्या नोटीस (**नि.क्र.२४ ते नि.क्र.२६**),

५) आखीव पत्रिका (**नि.क्र.२७**),

६) शिट नं. २३ चा नकाशा (**नि.क्र.२८**),

७) चौकशी पंजीची सत्यप्रत (**नि.क्र.२९**),

८) नोंदणी प्रमाणपत्र (**नि.क्र.३०**) व

९) दि.१०/०६/२०२१ रोजीचा ठराव (**नि.क्र.३१**).

**१०)** प्रतिवादींना त्यांचा पुरावा दाखल करण्याकरिता पुष्कळ संधी देण्यात आली. परंतु अभिलेखावर त्यांनी त्यांचा लेखी जबाब तसेच कोणताही पुरावा दाखल केला नाही. करिता सदर प्रकरण त्यांच्या पुराव्याशिवाय पुढे चालविण्यात आले.

मुद्दा क्र.०१ ते ०३ करिता :–

११) वरील नमूद मुद्यांवरील पुरावे एकसारखे असल्यामुळे त्यावरील विवेचन एकत्रितपणे करण्यात येते. वादीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वाद मालमत्ता ही बक्षिसपत्राद्वारे वादी संस्थेला देण्यात आली आहे व त्यामुळे वादी संस्था ही सदर मालमत्तेची मालक व ताबेदार आहे. सदर बाब सिद्ध करण्याकरिता वादी अरुण गुलाबराव पोहणे (सा.क्र.०१) याने त्याचा पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र.१८** वर दाखल केला आहे. त्यामध्ये सा.क्र.०१ ने नमूद केले आहे की, सदर प्रकरण हाताळण्यासंदर्भात त्याला संस्थेमार्फत ठराव पास करून अधिकार देण्यात आले आहेत. वादीने सदर ठरावाची सत्यप्रत अभिलेखावर **नि.क्र.३१** प्रमाणे दाखल केली आहे. यावरून असे दिसते की, वादी अरुण गुलाबराव पोहणे यांना सदर प्रकरण चालवण्यासंदर्भातचे अधिकार **नि.क्र.३१** वरील ठराव पास करून देण्यात आले आहेत. तसेच सा.क्र.०१ त्याचे पुराव्यामध्ये पुढे नमूद करतो की, सदर वाद मालमत्ता ही वादी संस्थेला एम.जी. कल्याण भाटीया यांनी दि.०३/०९/१९५५ रोजीच्या बक्षिसपत्राद्वारे दिली आहे व त्यामुळे वादी संस्था ही वाद मालमत्तेची मालक व ताबेदार आहे. सदर बाब सिद्ध करण्याकरिता वादीने अभिलेखावर **नि.क्र.२९** प्रमाणे भूमी–अभिलेख कार्यालय वरूड यांच्यामार्फत करण्यात आलेली चौकशी पंजीची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, त्यामध्ये श्री. एम.जी. कल्याणजी भाटीया यांनी श्री. दत्तात्रय संस्थान, शनिवार पेठ यांना बक्षिसपत्र क्र.१८११ अन्वये सदर जागा दि.०३/०९/१९५५ रोजी दिल्याचे नमूद आहे.

१२) तसेच वादीने नगर परिषद वरूड तर्फे देण्यात आलेल्या मालकी हक्काबाबतचा दाखला **नि.क्र.२१** प्रमाणे दाखल केला आहे. सदर दस्ताची पाहणी केली असता असे निदर्शनास येते की, सदर दाखला हा दत्तात्रय मंदिर देवस्थान

म्हणजेच वादीच्या नावे नगर परिषद वरूड यांनी दिला आहे. तसेच वादीने अभिलेखावर नगर परिषद वरूड यांची वाद मालमत्तेची कर आकारणी सूची देखील **नि.क्र.२२** प्रमाणे दाखल केली आहे. तसेच गट क्र.५३३/२५ चा ७/१२ उतारा **नि.क्र.२३** प्रमाणे व आखीव पत्रिका **नि.क्र.२७** प्रमाणे दाखल केली आहे. **नि.क्र.२३** ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, त्यावर दत्तात्रय संस्थान वरूड म्हणजेच वादी संस्थेचे नाव नमूद आहे. तसेच वाद मालमत्तेचा नकाशा **नि.क्र.२८** प्रमाणे वादीने दाखल केला आहे. **नि.क्र.२१** खालील मालकी हक्क दाखला, **नि.क्र.२३** वरील ७/१२ उतारा व **नि.क्र.२७** वरील आखीव पत्रिका यादस्तांवरून असे दिसते की, वादी हा वाद मालमत्तेचा ताबेदार आहे तसेच त्याच्याकडे सदर वाद मालमत्तेचा मालकी हक्क आहे.

**१३)** सा.क्र.०१ पुढे नमूद करतो की, वादीस संस्थानचे पूर्वी सखाराम महाराज म्हणून पुजारी होते. त्यांचे राहण्याकरिता त्यांना वाद मालमत्तेमध्ये खोपडी देण्यात आली होती. सखाराम महाराज मयत झाल्यानंतर त्यांचे नातेवाईक म्हणजेच प्रतिवादी यांना मंदिराची पुजा तसेच साफसफाई करण्याचे काम देण्यात आले व सदर खोपडी राहण्याकरिता देण्यात आली. सा.क्र.०१ पुढे नमूद करतो की, प्रतिवादींनी तिथे राहत असल्याचा फायदा घेऊन सदर वाद मालमत्तेमध्ये कच्ची खोपडी बांधून त्याभोवती तुऱ्हाटयाचे कुंपन लावले तसेच संडासचे बांधकाम केले व दरवाजा उभा केला. सदर कृत्यामुळे दत्तात्रय मंदिरामध्ये येण्या जाण्यास वादीला तसेच येणाऱ्या जाणाऱ्या इतर लोकांना अडथळा निर्माण झाला. त्यामुळे वादी संस्थेतर्फे प्रतिवादींना सदर अडथळा काढून टाकण्यासंदर्भात सांगण्यात आले. परंतु प्रतिवादींनी सदर अडथळा दूर केला नाही याउलट वादी संस्थेतील सभासदांना त्यांनी धमक्या दिल्या. त्यामुळे वादी संस्थेतर्फे प्रतिवादींविरूध्द नगर परिषद वरूड तसेच पोलीस स्टेशन वरूड येथे तक्रारी करण्यात आल्या.

१४) सा.क्र.०१ त्याचे पुराव्यामध्ये पुढे नमूद करतो की, नगर परिषद वरूड येथे करण्यात आलेल्या तक्रारी नंतर त्यांच्यामार्फत सर्व प्रतिवादींना त्यांनी सुरू केलेले बांधकाम थांबविण्यासंदर्भात नोटीसा पाठविण्यात आल्या. वादीने अभिलेखावर प्रतिवादींना पाठविण्यात आलेल्या नोटीस **नि.क्र.२४, २५ व २६** खालील दाखल केल्या आहेत. सदर नोटीसचे अवलोकन केले असता असे दिसते की, नगर परिषद वरूड तर्फे प्रतिवादींना मंदिर संस्थानच्या जागेवर विना परवानगी अतिक्रमण व अवैध बांधकाम होत असल्याबाबत सदर नोटीस दि.०९/०४/२०२१ रोजी पाठविण्यात आली होती. तसेच सर्व प्रतिवादींना त्या नोटीसद्वारे सदर बांधकाम त्वरित बंद करावे असे नगर परिषद वरूड तर्फे आदेशीत करण्यात आले होते. यावरून असे दिसते की, सदर वाद मालमत्तेवर प्रतिवादींतर्फे अवैधरित्या बांधकाम सुरू करण्यात आले होते.

१५) सा.क्र.०१ त्याचे पुराव्यामध्ये पुढे नमूद करतो की, प्रतिवादींनी वाद मालमत्तेवर अवैधरित्या केलेल्या बांधकामामुळे वादी संस्थेच्या सभासदांना तसेच इतर लोकांना मंदिरामध्ये येण्यास जाण्यास अडथळा निर्माण होत होता. वादी संस्थेतर्फे प्रतिवादींना सदर अडथळा दुर करण्यास सांगितले देखील होते परंतु प्रतिवादींनी सदर अडथळा दुर केला नाही असे सा.क्र.०१ याचे पुराव्यातून दिसून येते. प्रतिवादींना संधी देवुनही त्यांनी सा.क्र.०१ चा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे सदर प्रकरण सा.क्र.०१ च्या उलटतपासणीविना पुढे चालविण्यात आले. सबब सा.क्र.०१ चा पुरावा अबाधित राहिला.

१६) यानंतर वादीतर्फे सुरज मधुकरराव देशमुख (सा.क्र.०२) यांचा पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र.३२** प्रमाणे दाखल करण्यात आला. सा.क्र.०२ ने देखील वादीच्या साक्षीस अनुरूप अशी साक्ष दिली. त्यांनी देखील सदर वाद मालमत्ता ही

बक्षिसपत्राद्वारे वादी संस्थेला देण्यात आल्याचे नमूद केले. तसेच वाद मालमत्तेवर दत्तात्रय मंदिर संस्थान यांचा ताबा असल्याचे सा.क्र.०२ नमूद करतो. तसेच सा.क्र.०२ नमूद करतो की, प्रतिवादींनी गैरकायदेशीररीत्या वाद मालमत्तेवर खोपडी उभारून त्याभोवती कुंपन उभारले आहे. तसेच त्यावर संडासचे बांधकाम देखील केले आहे. सदर बांधकाम प्रतिवादींनी नगर परिषदेची कोणतीही परवानगी न घेता केले आहे. तसेच सदर बांधकामामुळे वादी संस्थेच्या सभासदांनी सदर मंदिरामध्ये ये जा करण्याकरिता अडचण निर्माण होत आहे असे सा.क्र.०२ त्याच्या पुराव्यामध्ये नमूद करतो. सा.क्र.०२ चा देखील प्रतिवादीतर्फे कोणताही उलटतपास घेण्यात आला नाही. त्यामुळे सा.क्र.०२ चा पुरावा देखील अबाधित राहिला.

**१७)** वादीतर्फे यानंतर घनश्याम गणेशराव अस्वलकर (सा.क्र.०३) यांचा पुरावा देण्यात आला. त्यांनी देखील त्यांच्या पुराव्यामध्ये सा.क्र.०१ व सा.क्र.०२ यांनी दिलेल्या साक्षीप्रमाणेच कथन केले. त्यांचा पुरावाही प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्यामुळे अबाधित राहिला.

**१८)** सा.क्र.०१ वादी, सा.क्र.०२ व सा.क्र.०३ या सर्वांनी एकमेकास पुरक साक्ष दिली आहे. त्यासर्वांनी त्यांच्या पुराव्यामध्ये नमूद केले आहे की, वाद मालमत्तेचे मालक व ताबेदार ही वादी संस्था आहे. त्याबाबतचे नगर परिषद वरूड यांनी दिलेला मालकी हक्काचा दाखला **नि.क्र.२१** प्रमाणे दाखल आहे. तसेच वादीने नगर परिषद वरूड यांची कर आकारणी पावती व गट क्र.५३३/२५ चा ७/१२ उतारा **नि.क्र.२२** व **नि.क्र.२३** प्रमाणे दाखल केले आहे. सदर दस्तांवरून असे दिसते की, वादी संस्था ही वाद मालमत्तेची ताबेदार आहे. तसेच वरील नमूद तिन्ही साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात नमूद केले आहे की, प्रतिवादी हे वाद मालमत्तेवर गैरकायदेशीररीत्या बांधकाम करत आहेत व त्यावरून त्यांनी नगर परिषद वरूड येथे

तक्रार दिली होती. नगर परिषद वरूड यांनी प्रतिवादींना पाठविलेल्या नोटीसा **नि.क्र.२४** ते **नि.क्र.२६** प्रमाणे दाखल आहे. यावरून असे दिसते की, प्रतिवादी हे वाद मालमत्तेवर गैरकायदेशीररीत्या बांधकाम करत होते व सदर बांधकाम थांबविण्यासाठी त्यांना नगर परिषदेतर्फे **नि.क्र.२४** ते **नि.क्र.२६** प्रमाणे नोटीस पाठविण्यात आल्या. त्यामुळे असे दिसते की, प्रतिवादी हे त्यांचा वाद मालमत्तेवर कोणताही हक्क व अधिकार नसताना गैरकायदेशीररीत्या त्यावर बांधकाम करत आहेत. सा.क्र.०१ ते सा.क्र.०३ हे देखील नमूद करतात की, सदर बांधकामामुळे त्यांना तसेच इतर लोकांना अडथळा निर्माण होत आहे. वरील नमूद तिन्हीं साक्षीदारांचा उलटतपास घेण्यास प्रतिवादी असमर्थ ठरले. त्यामुळे सा.क्र.०१ ते सा.क्र.०३ यांनी पटलावर आणलेला पुरावा अबाधित राहिला व त्यामुळे त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे पटलावर आलेल्या एकूण पुराव्यावरून वाद मिळकतीचे वादी हे मालकी हक्काने ताबेदार आहे हे वादीने सिद्ध केले आहे. तसेच प्रतिवादी गैरकायदेशीररीत्या वाद मालमत्तेवर बांधकाम करत आहे व त्यामुळे वादीला व इतर लोकांना सदर मालमत्तेमध्ये येण्या जाण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे ही बाब देखील वादीने पटलावर पुरावा आणून सिद्ध केली आहे. करिता पटलावर आलेल्या एकूण पुराव्यावरून मी मुद्दा क्र.०१ ते ०३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ०४ व ०५ करिता :–**

**१९)** मुद्दा क्र.०१ ते ०३ यांच्या होकारार्थी आलेल्या निष्कर्षावरून असे दिसते की, वाद मालमत्ता ही वादीच्या मालकी व ताब्यात आहे तसेच त्यावर प्रतिवादी हे गैरकायदेशीररीत्या बांधकाम करत आहेत व त्यामुळे वादीला व इतर लोकांना अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे सदर बांधकाम करण्यापासून प्रतिवादीला थांबविणे तसेच त्यांनी केलेले बांधकाम काढून टाकणे योग्य ठरते.

त्यामुळे प्रतिवादींनी वाद–मालमत्तेवर केलेले बांधकाम म्हणजेच कच्र्या स्वरूपात बांधलेली खोपडी, कुंपन, दरवाजा व संडास हे पूर्णत: नष्ट करावे असा हुकूम देणे योग्य होईल. तसेच भविष्यामध्ये प्रतिवादींनी सदर वाद–मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करू नये असा कायम मनाई हुकूम प्रतिवादीविरूध्द देणे सुद्धा महत्त्वाचे आहे. करिता मी मुद्दा क्र.०४ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.०५ करिता खालील आदेश पारित करीत आहे;

## आदेश

**०१.** सदर दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी क्र.०१ ते ०३ किंवा त्यांचे मार्फत इतर कोणीही यांना मनाई हुकुमाद्वारे आदेशीत केले जाते की, त्यांनी वाद–मालमत्तेवर (दाव्यामधील परिच्छेद क्र.०१ मध्ये वर्णन केलेली मालमत्ता) कोणत्याही प्रकारचे बांधकाम व त्याद्वारे अडथळा निर्माण करू नये.

**०३.** प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांना याद्वारे आदेशीत केले जाते की, त्यांनी वाद–मालमत्तेवर (दाव्यामधील परिच्छेद क्र.०१ मध्ये वर्णन केलेली मालमत्ता) बांधलेली खोपडी, कुंपन, दरवाजा व संडास हे पूर्णत: नष्ट करावेत.

**०४.** येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

RAJURKAR VIVEK VASANTRAO
Digitally signed by RAJURKAR VIVEK VASANTRAO
Date: 2026.05.21 17:09:42 +0530

ठिकाण : वरुड
दिनांक : २१/०५/२०२६

(**व्ही.व्ही. राजुरकर**)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
वरुड, ता.–वरुड, जि.–अमरावती.

**:- C E R T I F I C A T E :-**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. E. Nath,<br>Stenographer Grade-III |
| Name of the Court | Jt. CJJD & JMFC, Court No.2,<br>Warud, Tq. Warud Dist. Amravati. |
| Date of Judgment | 21/05/2026 |
| Judgment signed by Presiding Officer on | 21/05/2026 |
| Judgment uploaded on | 21/05/2026 |